महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
मुंबई विभागीय मंडळ, वाशी नवी मुंबई - ४०० ७०३

परिपत्रक क्र.मुंविमं/उ.मा.प./फेब्रु./मार्च -२०२५/गुणपत्रिका /2902-दिनांक १३/०५/२०२५

विषय :- फेब्रुवारी / मार्च -२०२५ इ.१२ वी परीक्षेच्या निकालाच्या गुणपत्रिका व इतर साहित्य वाटपाबाबत.
संदर्भ :- क्र.रा.मं./परीक्षा-२/१६७५, दि. १२/०५/२०२५

मुंबई विभागीय मंडळाच्या कार्यकक्षेतील सर्व मान्यताप्राप्त उच्च माध्य. शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयाच्या मुख्याध्यापक/प्राचार्यांना कळविण्यात येते की, उच्च माध्य. प्रमाणपत्र **फेब्रुवारी / मार्च -२०२५ परीक्षेस** प्रविष्ट झालेल्या विद्यार्थ्यांची मूळ **गुणपत्रके (Marksheet), स्थलांतर प्रमाणपत्र (Migration Certificate) व अभिलेखाची यादी (कन्सोलिडेटेड कॉलेज रजिस्टर) शुक्रवार, दिनांक १६/०५/२०२५ रोजी नियोजित वितरण केंद्रावर सकाळी ११.०० वाजता** वाटप करण्यात येणार आहे. वितरण केंद्रावर आपला प्रतिनिधी वरीलप्रमाणे साहित्य स्विकारण्यासाठी स्वतंत्र अधिकारपत्रासह पाठविण्याची व्यवस्था करावी. **विद्यार्थ्यांना त्याच दिवशी दुपारी ३.०० वाजता गुणपत्रिकांचे वाटप आपणांमार्फत करावयाचे असल्याने गुणपत्रिका वेळेत घेवून जाणे बंधनकारक राहील.**

तसेच गुणपत्रके व स्थलांतर प्रमाणपत्र आपल्या कनिष्ठ महाविद्यालयाची असल्याची खात्री करून प्रविष्ट विद्यार्थी संख्येनुसार आहेत किंवा नाही याची खातरजमा करावी. आपल्या कनिष्ठ महाविद्यालयाच्या असलेल्या विद्यार्थी संख्येपेक्षा गुणपत्रिकांची संख्या कमी अथवा जास्त असल्यास, अन्य कनिष्ठ महाविद्यालयाची गुणपत्रके आपल्याकडे आले असल्यास, तसेच गुणपत्रिका खराब असल्यास अथवा त्यामध्ये काही त्रुटी आढळल्यास गुणपत्रिका वाटपाच्या तारखेपासून **०७ दिवसाच्या** आत या विभागीय मंडळाच्या लेखी निदर्शनास आणावे. त्यानंतर कोणत्याही परिस्थितीत प्राप्त त्रुटी लक्षात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

फेब्रवारी / मार्च -२०२५ परीक्षेस श्रेणीसुधार योजनेतंर्गत प्रविष्ठ झालेल्या विद्यार्थ्यांना गुणपत्रिका घ्यावयाची असल्यास अथवा नाकारायची असल्यास इतर प्रविष्ठ झालेल्या विद्यार्थ्यांच्या फेब्रुवारी / मार्च - २०२५ परीक्षेच्या गुणपत्रिका वितरित केल्याच्या दिनांकापासून एक महिन्यापर्यंत विनाशुल्क विद्यार्थ्यांना देण्यात येतील त्याकरिता कनिष्ठ महाविद्यालयामार्फत मंडळास विकल्प देणे अनिवार्य आहे, तद्नंतर विकल्पासह दरमहा जादा शुल्क आकारून सहा महिन्यापर्यंत गुणपत्रिका देण्यात येईल. सहा महिन्यानंतर ते एक वर्षाच्या कालावधीपर्यंत कनिष्ठ महाविद्यालयाकडून विकल्प भरून प्रस्ताव प्राप्त झाल्यास राज्य मंडळाची मान्यता व रा.म. पत्रानुसार शुल्क आकारून गुणपत्रिका व प्रमाणपत्र देण्यात येईल. एक वर्षापर्यंत विकल्प सादर न केल्यास श्रेणीसुधारची गुणपत्रिका रद्द करून पूर्वीचीच गुणपत्रिका ग्राहय धरण्यात येईल. गुणपत्रिका दिल्यानंतर सहा महिन्यांचा कालावधी असला तरीही आपल्या शाळेतून / कनिष्ठ महाविद्यालयातून श्रेणीसुधार योजनेतंर्गत प्रविष्ठ झालेल्या सर्व विद्यार्थ्यांना त्वरित संपर्क साधून लवकरात लवकर विकल्प देण्याबाबत कळविण्यात यावे त्याचप्रमाणे तशी लेखी नोंद आपल्या दप्तरी जतन करून ठेवावी, जेणेकरून भविष्यात श्रेणीसुधार योजनेतंर्गत प्रविष्ठ विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार नाही याची दक्षता घ्यावी.

(ज्योत्स्ना शिंदे-पवार)
विभागीय सचिव,
मुंबई विभागीय मंडळ,
वाशी नवी मुंबई- ४०० ७०३.

Scanned with OKEN Scanner